# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

**(Formerly Pune University)**

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दुरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२११८८/८९
ई मेल : affiliation@pun.unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Academic Section (Affiliation Unit)
Ganeshkhind, Pune - 411007
Phone : 020-25621188/89
Email : affiliation@pun.unipune.ac.in
Website : www.unipune.ac.in

संदर्भ क्रं. सीए/५११

दिनांक : ०८ मे, २०२६

प्रति,

१. मा. अध्यक्ष/सचिव, संबंधित संस्था,
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,

**विषय : विद्यापीठ मान्यताप्राप्त नियमित आणि तदर्थ स्वरूपात किमान ५०% शिक्षक नियुक्ती बाबत....**

**संदर्भ :**
**१. परिपत्रक क्र. २२/२०२६ (सीए/१८० — दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६)**
**२. परिपत्रक क्र. ४७/२०२६ (सीए/३७५ — दिनांक ३१ मार्च, २०२६)**
**३. सीए/५०१ दिनांक २९/०४/२०२६ चे पत्र**

**महोदय/महोदया,**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८ (१)(च) मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचा—यांची संख्या, अर्हता, सेवेच्या अटी व शर्ती तसेच वित्तलब्धी या, विद्यापीठाने व राज्य शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असणे आणि त्या अभ्यास पाठयक्रम, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन यांच्याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असणे ही संलग्नीकरण तसेच मान्यता यांकरिताची अट असून त्याचे अनुपालन करणे संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांवर बंधनकारक आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच शासनाने विहीत केलेल्या किमान मानकानुसार ज्या संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये दि.३१/०३/२०२६ पर्यत नियमित आणि तदर्थ स्वरूपात नियुक्त झालेल्या आणि विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकांची किमान संख्या एकत्रितपणे ५०% पेक्षा कमी असेल अशा संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मध्ये थांबविण्यात यावेत, असा मा. विद्यापरिषदेने दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. वि.प.अ १५ पीए/१५/२०२६ नुसार निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार सदर शिक्षक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यासंबंधी दि. ३१ मार्च, २०२६ पर्यत मुदत संदर्भिय परिपत्रक क्र. १ अन्वये देण्यात आली होती. तदनंतर उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र. २ अन्वये सदर प्रक्रिया पूर्ण करण्याकरींता दिनांक १५/०४/२०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. तदनंतर संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार **दि. ०९ मे, २०२६** पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतू असे निदर्शनास आले आहे की अद्याप ब—याच महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची माहिती BOD पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात **upload** करावयाची बाकी आहे.

सबब, याबाबत प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील नियमित आणि तदर्थ स्वरूपात नियुक्त झालेले आणि विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकांची किमान संख्या एकत्रितपणे ५०% असल्याबाबतची संबंधित कागदपत्रे व माहिती BOD पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात **upload** करण्याकरिता **दि. १८ मे, २०२६** पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढ ही अंतीम मुदतवाढ असुन त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत माहिती BOD पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात **upload** करण्याकरीता मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी.

आपण याबाबतची प्रक्रिया **दि. १८ मे, २०२६** पर्यत पूर्ण न केल्यास याबाबत आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे समजून आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेमधील संबंधित अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

(प्रदिप कोळी)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

टिप:— महाविद्यालय/परिसंस्थांना माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास collegesupport@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क करावा.